International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# मराठीतील ऐतिहासिक कादंबरीचे जनक रामचंद्र भिकाजी गुंजीकर: एक अभ्यास

**डॉ. जगदीश सदाशिव आवटे**
*Corresponding Author-* **डॉ. जगदीश सदाशिव आवटे**
Gmail ID - aute.jagadish@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7070774

**सारांश :**

रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे मराठी साहित्यातील ऐतिहासिक कादंबरीचे आद्य कादंबरीकार म्हणून ओळखले जातात 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखन रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनी केले. गुंजीकरांना मराठी, संस्कृत, इंग्रजीबरोबरच गुजराती, कानडी व बंगाली याही भाषा अवगत होत्या.इंग्लंडमधील 'एडिंबरो रिव्हयू' व 'क्वार्टरली रिव्हयू' या नियतकालिकांच्या धर्तीवर मासिक निघावे या विचाराने १८६७ मध्ये 'विविधज्ञानविस्तारा'ची स्थापना झाली. त्याचे गुंजीकर हे पहिले संपादक होते. मराठी साहित्य समृद्धीकरणात गुंजीकर यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी अनेक मराठी ग्रंथांचे लेखन केलेले आहे.

**महत्त्वाचे शब्द :** कादंबरी, जनक, ऐतिहासिक, साहित्य, वाङ्‌मय.

## १. प्रस्तावना

सन. १८६७ मध्ये 'विविधज्ञान विस्तारा' मधून 'मोचनगड' नावाची रा. भि. गुंजीकर यांनी लिहिलेली 'कल्पित गोष्ट' क्रमशः प्रसिद्ध होऊ लागली. हीच मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी होय. गुंजीकरांच्या पद्धतीने कल्पित पात्रांच्या मध्यवर्ती कल्पनेवर उभारलेली दुसरी ऐतिहासिक कादंबरी '१८५७ सालचे बंडाची धामधूम किंवा हंबीरराव व पुतळाबाई' ही होय. ही कादंबरी १८७३ साली विष्णू जनार्दन पटवर्धन यांनी लिहिली. 'सुशीला, यमुना अथवा वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडाची धामधूम' आणि 'लक्ष्मी आणि सरस्वती' या दोन कादंबऱ्या लिहून बळवंत मनोहर पंडित यांनी या परंपरेत भर घातली.[१] ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून वरील सर्वांची उमेदवारी संपली आणि १८९० मध्ये हरी नारायण आपट्यांनी उर्फ हरिभाऊंनी पहिली ऐतिहासिक कादंबरी लिहिली.

हरिभाऊंची पहिली 'म्हैसूरचा वाघ' ही मेडोज टेलरच्या टिपू सुलतान इंग्रजी कादंबरीचे रूपांतर आहे. हरिभाऊंनी ऐतिहासिक कादंबरी लेखनाची सुरुवात पाश्चात्यांच्या अनुकरणाने केली असली तरी पुढील पाच वर्षात स्वतंत्र प्रज्ञेने कादंबरी लेखन केले. त्यांची 'उष:काल' ही कादंबरी खूपच लोकप्रिय झाली. पुढील वीस वर्षाच्या कालावधीत त्यांनी 'केवळ स्वराज्यासाठी', 'गड आला पण सिंह गेला', 'मध्यान्ह', 'सूर्योदय', 'सूर्य ग्रहण' इत्यादी मराठेशाहीच्या इतिहासावर आधारलेल्या कादंबऱ्या लिहून त्यांनी शिवशाहीचे कथामय स्मारक उभे केले. त्याचप्रमाणे 'रूपनगरची राजकन्या' चंद्रगुप्त आणि कालकूट' या कादंबरीतून राजपुतांच्या इतिहासातून मराठी वाचकांना हिंडवले. 'वज्राघात' या विजयनगरच्या साम्राज्या विषयीच्या कादंबरीला समीक्षकांची कलात्मक कादंबरी म्हणून गौरविले आहे.[२]

हरि नारायण आपटे, अनुसया देशपांडे, सी. के. दामले, चि, वि. वैद्य, सहकारी कृष्ण, ल. ना. जोशी, गो.वि. मुजुमदार, वा. वि भिडे, भि. गो भिडे, व. स. देसाई, नाथमाधव, वि. वा. हडप, गो. गो.

मुजुमदार, द. वि. परांजपे, यशोदाबाई भट, ना. के. बेहरे, ना. सी. फडके, न. चिं. केळकर, शिवाजी सावंत, रणजित देसाई, गो. नी. दांडेकर, ना. सं. इनामदार, स. शं. देसाई, कॅप्टन बेलवलकर, भीमराव कुलकर्णी, विश्वास पाटील इत्यादी कादंबरीकारांनी ऐतिहासिक कादंबरीच्या मुकुटात मानाचे कादंबरीरुपी शिरपेच खोवले आहेत. त्यापैकी एक आद्य ऐतिहासिक कादंबरीकार रा. भि गुंजीकर ( रामचंद्र भिकाजी गुंजीकर ) हे होत.

**२. रा. भि. गुंजीकर यांचे बालपण व शिक्षण**

रा. भि. गुंजीकर म्हणजेच रामभाऊ यांचा जन्म जांबोरी (जिल्हा बेळगाव) येथे झाला. त्यांच्या वडिलांनी त्यांचा संस्कृत भाषेचा अभ्यास घरीच करून घेतला होता. मराठी प्राथमिक शिक्षण जन्मगावी तर इंग्रजी शिक्षण बेळगाव येथे झाले. १८६० साली ते पब्लिक सर्व्हिस परीक्षा उत्तीर्ण झाले व पुढील शिक्षणासाठी मुंबईला गेले. एल्फिन्स्टन हायस्कूलमधून १८६४ मध्ये ते प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी नाव नोंदविले, परंतु परिस्थितीमुळे ते उच्च शिक्षणापासून वंचित राहिले.

ज्या एल्फिन्स्टन हायस्कुलात ते शिकले, तेथेच १८६६ पासून २२ वर्षे त्यांनी अध्यापक म्हणून काम केले. पदोन्नती करीत रामभाऊ असिस्टन्ट डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर झाले. मराठी, संस्कृत, इंग्रजी यांखेरीज बंगाली, उर्दू, कानडी व गुजराती ह्या भाषाही त्यांना चांगल्या अवगत होत्या. स्वभाषा-सेवा हीच स्वधर्म सेवा, असे ते मानत. ‘मित्रोदय’ वर्तमानपत्रात ते लिहीत. ‘विविधज्ञानविस्तार’ मासिक १८६७ मध्ये निघाले. श्री. नाडकर्णी हे त्याचे जाहीर संपादक असले, तरी पहिली सात वर्षे गुंजीकर हेच त्याचे संपादन करीत.[३]

**३. रा. भि. गुंजीकर व विविधज्ञानविस्तार**

१८६६ साली महाविद्यालयात शिकत असताना गुंजीकरांनी 'मित्रोदय' या वृत्तपत्रातून लिहिण्यास सुरूवात केली होती. इंग्लंडमधील 'एडिंबरो रिव्ह्यू' व 'क्वार्टरली रिव्ह्यू' या नियतकालिकांच्या धर्तीवर मासिक निघावे असा विचार त्यांच्या मनात होता. याच विचारातून १८६७ मध्ये त्यांनी 'विविधज्ञानविस्तार' या प्रख्यात मासिकाची स्थापना केली. गुंजीकर हे या मासिकाचे पहिले संपादक होते. परंतु, सरकारी नोकरीमुळे त्यांचे नाव अंकावर छापण्यात आले नव्हते. पहिल्या अंकात संपादकांनी या मासिकाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे. 'याच्या परिमाणानुसार त्यात नानाविध विषयांचा संग्रह केला जाईल. शास्त्रीय विषय, देशज्ञान, विख्यात पुरुषांची चरित्रे, नवीन पुस्तकांचे गुणावगुण विवेचन, नीतिवादाचे निबंध इत्यादी अनेक विषयांचा संग्रह करणार आहोत.

रामचंद्र गुंजीकर हे लेखक आणि ‘विविधज्ञानविस्तार’ या प्रख्यात मासिकाचे आद्य संपादक म्हणून प्रसिद्ध आहेत. भाषिक संशोधन, व्याकरण, ललित वाङ्मय अशा विषयांवरचे उत्तमोत्तम लेख त्यांनी त्यातून प्रसिद्ध केले. मराठीबरोबरच त्यांना संस्कृत, उर्दू, इंग्लिश, गुजराती, कानडी आणि बंगाली अशा अनेक भाषा अवगत होत्या. यामुळे त्यांनी अनेक नावीन्यपूर्ण आणि सामान्य ज्ञान देणारी सदरे सुरू करून अंक माहितीपूर्ण केला. पहिली सात वर्षे (१८६७-१८७४) त्यांनी सातत्याने व परिश्रमपूर्वक संपादन केले. अनेक व्यासंगी विद्वानांचे सहकार्य मिळवून उच्च दर्जाचे ज्ञानप्रसारक नियतकालिक असा लौकिक त्यांनी ‘विविध ज्ञानविस्ताराला मिळवून दिला. 'मराठी भाषा', 'मराठी भाषेचे कोश', 'देशभाषांची दुर्दशा', 'आपल्या भाषेची स्थिती', 'आपल्या भाषेचे पुढे काय होणार?', 'मराठी कविता', 'काव्यविचार', 'व्याकरण विचार' यातील त्यांचे लेख पाहिले की, त्यांचे सखोल विचार आणि तळमळ लक्षात येते.[४] भाषा, व्याकरण आणि लेखन शुद्धी संदर्भात त्यांचा विशेष अभ्यास

होता. त्यांनी 'दंभहारक' नावाच्या मासिकाचे संपादन केले होते.

**४. रा. भि. गुंजीकर व ऐतिहासिक कादंबरी**

मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी मोचनगड, गोदावरी, अभिज्ञान शाकुंतल, रोमकेतुविजया, विद्यावृद्धीच्या कामी आमची अनास्था, सरस्वती मंडळ, भ्रमनिरास, सौभाग्यरत्नमाला, कौमुदीमहोत्साह (३ खंड) सुबोधचंद्रिका, रामचंद्रिका, कन्नडपरिज्ञान, असे त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे 'मनोरमा,' 'प्रेम बंधन', 'राजा शिवाजी' यासारखे त्यांचे अनेक पुस्तकांवरील टीकालेख वाचण्याजोगे आहे. शाकुंतल नाटकाचे त्यांनी केलेले सुरस भाषांतर आज दुर्मिळ आहे. भाषा, व्याकरण व लेखन शुद्धी हे गुंजीकर यांच्या चिंतनाचे विषय होते. वाङ्मयक्षेत्रात वावरणाऱ्या अनेक समकालीन व उत्तरकालीन लेखकांना त्यांच्या लेखांनी विचार आणि कार्य करण्यास प्रवृत्त केले. मोचनगड च्या रूपाने गुंजीकरांनी ऐतिहासिक कादंबरीचा एक उत्कृष्ट आदर्श निर्माण केला आहे. शिवाजी महाराजांच्या उदयकाळातील मराठ्यांचे जीवन व तत्कालीन वातावरण यांचे जिवंत चित्रण या कादंबरीत आढळते. गुंजीकर यांची 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी. शिवकालाच्या पार्श्वभूमीवर काल्पनिक पात्रे व प्रसंग निर्माण करून लिहिलेली ही कादंबरी आहे.[५]

शिवाजी महाराज ह्या कादंबरीत अगदी अखेरीअखेरीस येतात. कादंबरीच्या उद्दिष्ट विषयी गुंजीकरांच्या निश्चित कल्पना होत्या, असे दिसते. त्यांच्याशी प्रामाणिक राहून त्यांनी शिवकालीन इतिहासाची काटेकोर जाण ठेवली व शिवकालाचे जिवंत वातावरण निर्माण केले. ऐतिहासिक कादंबरीचा एक उत्कृष्ट आदर्श म्हणून अ. का. प्रियोळकर यांसारख्या चिकित्सक विद्वानांनी ह्या कादंबरीला मान्यता दिली आहे. 'गोदावरी' ही त्यांची पोर्तुगीजांच्या इतिहासाशी संबंधित अशीच कादंबरी होती, पण ती पूर्ण होऊ शकली नाही.

१८ जून १९०१ रोजी रामचंद्र भिकाजी गुंजीकर मुंबईत निधन झाले. ते तत्कालीन उल्लेखनीय साहित्यिक होते. विशेषतः मूळचे गोव्याचे असल्यामुळे त्यांनी गोव्यातील मराठी साहित्यात घातलेली भर फार मोलाची आहे.[६]

**५. रा. भि. गुंजीकर यांची प्रमुख ग्रंथसंपदा**

1. मोचनगड (कादंबरी १८७१),
2. अभिज्ञानशाकुंतल (भाषांतर १८७०),
3. रोमकेतू विजय (शेक्सपिअरच्या 'रोमियो ज्युलिएट'चे भाषांतर १८६९),
4. कौमुदी महोत्साह (१८७८-१८७९),
5. सरस्वतिमंडळ व भ्रमनिरास (१८८४),
6. सौभाग्यरत्नमाला (१८८६),
7. विद्यावृद्धीच्या कामी आमची अनास्था (व्याख्यान, १८८७),
8. सुबोधचंद्रिका (भगवद्गीता टीका, मूळ व भाषांतर),
9. बंगाली व्याकरण
10. कानडी भाषा (लेख) व इतर अनेक स्फुट लेख, ग्रंथ परीक्षणे.[७]

**६. समारोप**

रा. भि. गुंजीकर यांचे भाषा, लिपी आदि संबंधित लेख आहेत. भाषा, व्याकरण व लेखन शुद्धी हे गुंजीकर यांच्या चिंतनाचे विषय होते. वाङ्मयक्षेत्रात वावरणाऱ्या अनेक समकालीनांना व उत्तरकालीनांना त्यांच्या लेखांनी विचारप्रवृत्त व कार्य प्रवृत्त केले. मोचनगड च्या रूपाने गुंजीकरांनी ऐतिहासिक कादंबरीचा एक उत्कृष्ट आदर्श निर्माण केला आहे. शिवाजीच्या उदय काळात मराठ्यांचे जीवन व तत्कालीन वातावरण यांचे जिवंत चित्रण या कादंबरीत आढळते. गोदावरी ही पोर्तुगीजांच्या इतिहासाशी संबंधित अशी कादंबरी, पण ती पूर्ण होऊ शकली नाही. रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे

तत्कालीन उल्लेखनीय साहित्यिक होते. विशेषतः मूळचे गोव्याचे असल्यामुळे त्यांनी गोव्यातील मराठी साहित्यात घातलेली भर फार मोलाची आहे.

**संदर्भ**


1. दैनिक प्रभात, 'विविधा (पुरवणी) - रामचंद्र गुंजीकर', दि. १८ जून २०१९, पुणे.
2. "एक वाङ्मय प्रकाराचा अभ्यास: कादंबरी" शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृष्ठ. क्र. ४,५,६
3. https://www.loksatta.com/lokrang/pioneer-of-marathi-novel-1079011/
4. गुंजीकर रामचंद्र भिकाजी, (१९०१), "बालबोध", पृष्ठ. क्रमांक - ७७
5. तत्रैव,पृष्ठ. क्रमांक - ७७
6. सातोस्कर बा. द, (१९८६),"मराठी मासिकांचे पहिले शतक," शुभदा सारस्वत प्रकाशन
7. पुणे,पृष्ठ. क्रमांक - ८०
8. देशमुख उषा, (१९९५)," विविधज्ञानविस्तार साहित्य आणि साहित्यविचार," स्नेहवर्धन
9. प्रकाशन, पुणे, पृष्ठ. क्रमांक - ६५
10. आंबेकर वि. भा. (१९७३),"मराठी वाङ्मयाचा इतिहास", खंड पाचवा, भाग पहिला, (संपादक.
11. रा. श्री. जोग), महाराष्ट्र साहित्य परिषद. पुणे,
12. गुंजीकर रा. भि. (१८७१),"मोचनगड", व्हीनस प्रकाशन, पुणे.
13. https://vishwakosh.marathi.gov.in